| CNR No. MHRT080004642020 | दाखल तारीख – २६/१०/२०२० |
|---|---|
| | नोंदणी तारीख – २६/१०/२०२० |
| | निकाल तारीख – ०४/०८/२०२६ |
| | कालावधी – ०५ वर्षे ०९ महिने ०९ दिवस |

**फॉर्म नं. XXXII**

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI चा परीच्छेद ४४ (i)**

**देवरुख येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात,**

**ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.**

**(पिठासीन अधिकारी – रोहिणी रा. कुलकर्णी)**

**न्यायनिर्णय दिनांक ०४/०८/२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्र. ५२/२०२०** **निशाणी क्रमांक – ७७**

प्रथम खबरी अहवालाचा तपशीलः

| | |
|---|---|
| गुन्हा नोंदणी क्रमांक | २८/२०२०, दिनांक २२/०५/२०२० |
| पोलीस ठाणे | संगमेश्वर पोलीस ठाणे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र सरकारतर्फे पोलीस ठाणे अंमलदार**, संगमेश्वर पोलीस ठाणे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. **मूळ फिर्यादीः दिनेश बापू कांबळे,** वय – ४४ वर्षे, **राहणार** – आंबेड खुर्द, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. |
| **उपस्थिती** | श्री. ए. एल. दड्डेकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |

| | |
|---|---|
| आरोपी | **१. सुरेंद्र लक्ष्मण कांबळे,**<br>**वय** – ५२ वर्षे, **व्यवसाय** – शेती,<br><br>**२. नितीन लक्ष्मण कांबळे,**<br>**वय** – ५६ वर्षे, **व्यवसाय** – काही नाही,<br><br>**३. सागर यशवंत कांबळे,**<br>**वय** – ३३ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,<br><br>**४. कुणाल सुरेंद्र कांबळे,**<br>**वय** – २४ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,<br>**सर्व राहणार** – आंबेड खुर्द, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी. |
| उपस्थिती | श्री. आर. के. शिंदे, श्री. सी. व्ही. लिंबूकर, आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ. |

**भाग ब**

**(फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI चा परीच्छेद ४४ (ii)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २२/०५/२०२० |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २२/०५/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २६/१०/२०२० |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | १३/०१/२०२३ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | ०७/०४/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयास ठेवल्याची तारीख | ०७/०७/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय घोषित तारीख | ०४/०८/२०२६ |
| प्रकरणात काही शिक्षा झाल्याची तारीख | निरंक |

## आरोपीचा तपशील

| **अ.क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक केल्याचा दिनांक** | **जामीनावर मुक्त केल्याचा दिनांक** | **गुन्हयाचे कलम** | **दोषी ठरविले की, निर्दोष मुक्त केले** | **शिक्षा झाली असल्यास तपशील** | **संपरीक्षे दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरेंद्र लक्ष्मण कांबळे | २६/०५/२०२० | २६/०५/२०२० | भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०६ सह कलम १४९ अन्वये. | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |
| २. | नितीन लक्ष्मण कांबळे | २६/०५/२०२० | २६/०५/२०२० | | | | |
| ३. | सागर यशवंत कांबळे | – | – | | | | |
| ४. | कुणाल सुरेंद्र कांबळे | २६/०५/२०२० | ०९/०२/२०२१ | | | | |

## न्यायनिर्णय

## (खुलया न्यायालयात घोषित)

प्रस्तुत आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (संक्षिप्तमध्ये यापुढे

भा.दं.वि.) चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०६ सह कलम १४९ अन्वये, शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयासाठी संपरीक्षा घेण्यात आली.

०२) अभियोगपक्षाच्या खटल्याचा थोडक्यात सारांश असा आहे की, दिनांक २२/०५/२०२० रोजी ०९:०० ते ०९:३० वाजताच्या सुमारास मौजे आंबेड खुर्द, बुध्दविहाराचे आवारात, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी दोन विधीसंघर्षीत बालक यांचेसह मिळून गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या जमाव जमवून फिर्यादीचा भाऊ – दिपक बापू कांबळे यास लाकडी रिपने डोक्यात मारुन व लाकडी दांडक्याने त्याचे हातापायावर, पाठीवर मारहाण करुन त्यास दुखापत केली. तसेच त्यांनी लाकडी दांडक्याने फिर्यादीस शिवीगाळ व ढकलाबुकल करुन त्याचे हातापायावर, पाठीवर, उजवे हाताचे दंडावर फटका मारुन दुखापत केली व सोडवासोडव करण्यास आलेल्या साक्षीदार – गौतम गंगाराम कांबळे यांचे उजवे हाताचे मनगटावर फटका मारुन दुखापत केली. तसेच त्या सर्वांनी मिळून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

०३) सदरच्या घटनेबाबत दिनेश बापु कांबळे यांनी संगमेश्वर पोलीस ठाणे येथे आरोपींविरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्यादीन्वये संगमेश्वर पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदणी क्र. २८/२०२० दाखल झाला. श्री. डी. व्ही. विभुते, सहाय्यक पोलीस फौजदार/७९६, संगमेश्वर पोलीस ठाणे यांनी गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा करुन साक्षीदारांचे जबाब नोंदविले. संपूर्ण तपास झाल्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र क्रमांक ४१/२०२० दाखल केले.

०४) आरोपी क्र. ०१ ते ०४ प्रस्तुत खटल्याचे कामी हजर झाल्यानंतर माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपींविरुध्द निशाणी क्रमांक २४ अन्वये भा.दं.वि. चे कलम १४३,

१४७, १४८, ३२४, ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयाचा दोषारोप निश्चीत केला. दोषारोपातील सर्व मजकूर आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी निशाणी क्रमांक २५ ते २८ अन्वये गुन्हा नाकबूल केला आहे. प्रस्तुत सर्व आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये आरोपींचे निवेदन निशाणी क्रमांक ७२ ते ७५ कडे नोंदविण्यात आलेले असून त्यामध्ये आरोपींनी नकारात्मक व खोटा खटला दाखल केल्याचा बचाव घेतला आहे.

**०५)** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वरील बाबींचा विचार करीता खालील मुद्दे विचाराधीन आले आहेत. सदर मुद्दयांवरील माझे निष्कर्ष मी कारणांसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे –

| ***अ.क्र.*** | ***मुद्दा*** | ***निष्कर्ष*** |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक २२/०५/२०२० रोजी ०९:०० ते ०९:३० वाजताच्या सुमारास मौजे आंबेड खुर्द, बुध्दविहाराचे आवारात, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी दोन विधीसंघर्षीत बालक यांच्यासह मिळून गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या जमाव जमविला व आरोपी हे त्या जमावाचे सदस्य होते आणि त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि.चे कलम १४३ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा केला? | **...नाही.** |

| | | |
|---|---|---|
| २) | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारेखस, वेळेस व ठिकाणी आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी दोन विधीसंघर्षीत बालक यांच्यासह मिळून गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या जमाव जमवून दंगा केला व त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि.चे कलम १४७ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा केला? | **...नाही.** |
| ३) | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारेखस, वेळेस व ठिकाणी आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी दोन विधीसंघर्षीत बालक यांच्यासह मिळून गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या जमाव जमवून हातात प्राणघातक हत्यारे घेवून दंगा केला व त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि.चे कलम १४८ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा केला? | **...नाही.** |
| ४) | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारेखस, वेळेस व ठिकाणी आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी दोन विधीसंघर्षीत बालक यांच्यासह मिळून गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या जमाव जमवून दंगा करुन फिर्यादी व साक्षीदाराने लाकडी रिप व लाकडी दांडक्याने मारहाण करुन दुखापत केली व त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा केला? | **...नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ५) | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारेखस, वेळेस व ठिकाणी आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी दोन विधीसंघर्षीत बालक यांच्यासह मिळून गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीररीत्या जमाव जमवून दंगा करुन फिर्यादी व साक्षीदारांना जीवे मारण्याची धमकी देवून फौजदारी धाकदपटशा दाखविला व त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा केला? | **...नाही.** |
| ६) | अंतिम आदेश काय ? | **...आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्रमांक ०१ ते ०५ करीता</u> –**

**०६)** सदर मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने व त्याबाबतीत पुरावा एकत्र आल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. दिनेश (अ.सा.क्र.०१) यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक २२/०५/२०२० रोजी ते त्यांच्या गावी हजर असताना त्यांच्या ग्रामपंचायतीने कोरोना विषाणु संदर्भात नेमण्यात आलेल्या कृतीदलामध्ये ते, प्रमोद कांबळे, अतुल कांबळे, शैलेश कांबळे, नथुराम कांबळे असे समाविष्ट होते व त्यावेळी त्यांना आरोपींपैकी सागर यशवंत कांबळे हा मुंबईहुन गावी आल्याचे कळाले. त्यामुळे ते सागर यशवंत कांबळे यांच्या घरी ते कोठुन आले, कोरोना संदर्भात त्यांनी काय खबरदारी घेतली व

राहण्यासाठी त्यांना स्वतंत्र घर पाहिजे आहे का, अशी चौकशी करण्यासाठी जावून त्यांना आवश्यक असलेले साहित्य त्यांनी पैसे दिल्यास ते पुरविण्यास तयार असल्याचे सांगून त्यानंतर ते त्यांच्या घरी निघुन गेले. त्यांचे चुलत भाऊ म्हणजे आरोपी क्र.०१ चा ते सागर कांबळे यांच्या घरी गेलेबाबत गैरसमज झाला होता व त्यामुळे आरोपी क्र. ०१ ने त्यांना फोन केला असता फोनवर त्यांच्यात बोलणे झाले व गैरसमजामुळे फोनवर त्यांच्या वादावादी झाल्यामुळे ते संगमेश्वर पोलीस ठाण्यात गेले होते.

**०७)** दिनेश (अ.सा.क्र.०१) यांनी त्यांच्या सरतपासात पुढे असे कथन केले आहे की, कोरोना विषाणु संसर्ग टाळण्यासाठी त्यांनी काय खबरदारी घेतली आहे, याची माहिती मिळविण्यासाठी ते पोलीस ठाण्यात गेले होते व पोलीसांनी त्यांची तक्रार घेतली होती व त्या तक्रारीमधील मजकुर बरोबर होता का, हे त्यांना आठवत नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास साक्षीदरम्यान सहकार्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलटतपासाच्या स्वरुपातील प्रश्ने विचारली. त्यामध्ये साक्षीदारास तक्रारी जबाबातील घटनेचा मजकूर वाचून दाखविला असता, तो बरोबर नसल्याचे व सदर तक्रारीवर असलेली स्वाक्षरी त्यांची नसल्याचे साक्षीदाराने कथन केले आहे. पुढे सदर साक्षीदाराने न्यायालयाबाहेर तडजोड होवून आरोपींसोबतचा वाद मिटला असल्याचे मान्य केले आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास बचावपक्षाने नाकारला आहे.

**०८)** गौतम (अ.सा.क्र.०२) व दिपक (अ.सा.क्र.०३) यांनी अभियोगपक्षास साक्षीदरम्यान सहकार्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलटतपासाच्या स्वरुपातील प्रश्ने विचारली. त्यामध्ये त्यांना त्यांच्या तपासटिपणातील घटनेविषयीचा मजकूर वाचून दाखविला असता, तो बरोबर नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. पुढे सदर साक्षीदारांनी न्यायालयाबाहेर तडजोड होवून आरोपींसोबतचा वाद

मिटला असल्याचे मान्य केले आहे. सदर साक्षीदारांचा उलटतपास बचावपक्षाने नाकारला आहे.

०९) दिनकर (अ.सा.क्र.०४) यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, दिनांक २०/०५/२०२० रोजी ते पोलीस ठाणे संगमेश्वर येथे कार्यरत असताना त्यादिवशी संगमेश्वर पोलीस ठाण्यात प्रस्तुतचा अपराध क्र. २८/२०२० चा तपास पोलीस निरीक्षक यांच्या निशाणी क्र. ६२ कडील आदेशान्वये त्यांच्याकडे देण्यात आला. त्यानंतर, दिनांक २२/०५/२०२० रोजी घटनास्थळी जावुन त्यांनी पंचांसमक्ष निशाणी क्र.६३ कडील घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यावेळी सदर ठिकाणाहुन त्यांनी वस्तू 'अ' कडील दोन लाकडी रिप व वस्तू 'ब' कडील दोन लाकडी बांबुचे तुकडे पंचांसमक्ष जप्त केले होते. त्यावेळी त्यांनी निशाणी क्र. ६४ कडील घटनास्थळाचा कच्चा नकाशा रेखाटला होता व सदर पंचनाम्यावेळी एकूण चार छायाचित्रे पोलिस नाईक श्री. सचिन कामेरकर यांनी घेतली होती. त्यानंतर, गुन्हयातील साक्षीदार – दिपक कांबळे याने पोलीस ठाण्यात हजर केलेले त्याच्या अंगावरील कपडे – एक टिशर्ट व एक हाफ पँट त्यांनी निशाणी क्र. ६५ कडील कपडे जप्तीचा पंचनामा १८:२० ते १८:३५ च्या दरम्यान पुर्ण करुन जप्त केले व सदर जप्त मुद्देमालाची निशाणी क्र. ६६ कडील पावती तयार करुन तो मुद्देमाल त्यांनी पोलिस ठाण्यातील मुद्देमाल कारकूनाकडे जमा केला.

१०) दिनकर (अ.सा.क्र.०४) यांनी त्यांच्या सरतपासात पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर त्यांनी साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे तपासटिपणे नोंदविली. साक्षीदार दिपक बापू कांबळे याच्या तपासटिपणातील निशाणी क्र. ६७ कडील व साक्षीदार गौतम गंगाराम कांबळे याच्या तपासटिपणातील निशाण क्र. ६८ कडील मजकूर त्यांनी त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविला आहे. त्यानंतर, फिर्यादी – दिनेश बापु कांबळे व जखमी साक्षीदार – दिपक बापु कांबळे, गौतम गंगाराम कांबळे यांचे वैद्यकीय

प्रमाणपत्रे हस्तगत करुन त्यांनी ती अभिलेखावर समाविष्ठ केली व छायाचित्रकार – पो.ना.श्री. सचिन कामेरकर यांचे भा.पु.का.कलम ६५–ब अन्वयेचे प्रमाणपत्र हस्तगत करुन त्यांनी ते अभिलेखावर समाविष्ठ केले. आरोपी क्र. ०१, ०२ व ०४ यांना दिनांक २६/०५/२०२० रोजी गुन्हयाच्या कामी अटक करुन त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपी क्र. ०३ यास विलगीकरणामध्ये ठेवण्यात आल्याने त्याला अटक करता आली नसल्यामुळे त्यांनी त्याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ–१ अन्वये निशाणी क्र. ६९ कडील नोटीस दिली होती.

**११)** दिनकर (अ.सा.क्र.०४) यांनी त्यांच्या सरतपासात पुढे असे कथन केले आहे की, सरपंच, ग्रामपंचायत आंबेड खुर्द, ता. संगमेश्वर यांना त्यांनी वाडीमध्ये कृतीदल नेमल्याबाबत व मा. जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश इत्यादी कागदपत्रांची प्रत मागविण्याकरीता निशाणी क्र. ७० कडील पत्र दिले होते. त्यानंतर त्यांनी आरोपी क्र. ०१ ते ०४ विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले व इतर दोन आरोपी हे विधी संघर्षीत बालक असल्याने त्यांच्याविरुध्द मा. बाल न्यायमंडळ येथे दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराने उलटतपासात बचावपक्षातर्फे विचारलेली विरुध्द उत्तरसुचक प्रश्ने नाकारली आहेत.

**१२)** अभिलेखावरील कागदी पुरावा पाहिला असता, दिनेश (अ.सा.क्र.०१) यांच्या साक्षीतून गुन्ह्याची फिर्याद सिध्द झालेली नाही. दिनेश (अ.सा.क्र.०१), गौतम (अ.सा.क्र.०२) व दिपक (अ.सा.क्र.०३) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये आरोपींविरुध्द काहीही कथन केले नाही. सरतपासात त्यांनी न्यायालयाबाहेर तडजोड होवून आरोपींसोबतचा वाद मिटला असल्याचे मान्य केले आहे. दिनकर (अ.सा.क्र.०४) यांच्या साक्षीतून अभियोगपक्षाने गुन्ह्याचा झालेला तपास अभिलेखावर आणला आहे. प्रकरणात जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्रे अभिलेखावर दाखल असले तरीही, सदर

वैद्यकीय प्रमाणपत्रांची शाबीती अभियोगपक्षातर्फे करुन घेण्यात आलेली नाही. त्यामुळे, अभिलेखावरुन, आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी दोन विधीसंघर्षीत बालक यांच्यासोबत मिळून गुन्हा करण्याच्या समान हेतूने बेकायदेशीरित्या जमाव जमवून हातात प्राणघातक हत्यारे घेवून दंगा करुन फिर्यादी व साक्षीदारांना लाकडी रिप व लाकडी दांडक्याने मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत अभिलेखावर ठाम व सबळ पुरावा आलेला नाही. त्यामुळे भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०६ सह कलम १४९ अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द झालेला नाही.

**१३)** त्यामुळे, आरोपींनी घटनेवेळी घटनास्थळी गुन्हा केला असलेबाबत शंका निर्माण होते. त्यामुळे, शंकेचा फायदा मिळून सर्व आरोपी गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द झालेला नसल्याने मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्रमांक ०६ बाबत</u>** –

**१४)** वरील विवेचन गृहीत धरता, आरोपी क्र. ०१ ते ०४ हे गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. दिनेश (अ.सा.क्र.०१), गौतम (अ.सा.क्र.०२) व दिपक (अ.सा.क्र.०३) यांच्या न्यायालयातील साक्षीतील कथन त्यांचे पोलीसांकडे नोंदविलेल्या जबाबाशी विसंगत आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीत आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याने वाद मिटलेला असल्याचे कथन केले आहे. सबब, न्यायालयातील साक्षीत सदर साक्षीदारांनी तशी भुमिका घेतल्याचे दिसून येत असल्याने खोटी साक्ष दिल्याच्या गुन्हयासाठी त्यांचेविरुध्द कारवाई करणे, उचीत वाटत नाही.

**१५)** दोषारोपपत्रातील अनुक्रमांक ०१ वरील जप्त मुद्देमाल – एक रिप, अनुक्रमांक ०२ कडील एक लाकडी रिपचा तुकडा, अनुक्रमांक ०३ कडील एक बांबूचा तुकडा, अनुक्रमांक ०४ कडील एक बांबूचा तुकडा, अनुक्रमांक ०५ कडील एक

आकाशी रंगाचा टि–शर्ट व अनुक्रमांक ०६ कडील एक हिरवट खाकी हाफ पँट इत्यादी मुद्देमाल मुल्यहिन असल्याने अपीलाचा कालावधी संपल्यानंतर कायद्याच्या तरतुदीनुसार त्यांचा नाश करण्याचा आदेश करणे, न्यायोचीत होईल. सबब, मुद्दा क्रमांक ०६ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१) आरोपींची भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०६ सह कलम १४९ अन्वये, शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांतून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपींचे वैयक्तिक व जामीनदारांचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/–(पंधरा हजार फक्त) चे बंधपत्र द्यावे.

४) दोषारोपपत्रातील अनुक्रमांक ०१ ते ०६ वरील जप्त मुद्देमालांचा अपीलाचा कालावधी संपल्यानंतर कायद्याच्या तरतुदीनुसार नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत केला असे.)

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.08.05 17:26:50 +0530

**दिनांक – ०४/०८/२०२६**
**देवरुख.**

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, देवरुख,**
**जि. रत्नागिरी.**

## परिशिष्ट I

## भाग क

## (फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI परीच्छेद ४४ (iii)

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.०१ | दिनेश बापू कांबळे | निशाणी क्रमांक ५६ | फिर्यादी |
| अ.सा.क्र.०२ | गौतम गंगाराम कांबळे | निशाणी क्रमांक ५७ | साक्षीदार |
| अ.सा.क्र.०३ | दिपक बापु कांबळे | निशाणी क्रमांक ५८ | साक्षीदार |
| अ.सा.क्र.०४ | दिनकर विठोबा विभुते | निशाणी क्रमांक ६१ | तपासीक अधिकारी |

## बचावपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| **निरंक** | | |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## अभियोगपक्षातर्फे निशाणी क्रमांकांची यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | ६२ | तपासाचा लेखी आदेश |

| | | |
|---|---|---|
| २ | ६३ | घटनास्थळ पंचनामा |
| ३ | ६४ | घटनास्थळ नकाशा |
| ४ | ६५ | कपडे जप्तीचा पंचनामा |
| ५ | ६६ | मुद्देमाल पावती |
| ६ | ६७ | दिपक बापु कांबळे याचे तपासटिपणातील चिन्हांकित भाग–अ कडील मजकूर |
| ७ | ६८ | गौतम गंगाराम कांबळे याचे तपासटिपणातील चिन्हांकित भाग–अ कडील मजकूर |
| ८ | ६९ | आरोपी क्र. ०३ याला फौ.प्र.संहिताचे कलम ४१–अ अन्वये दिलेली नोटीस |
| ९ | ७० | सरपंच ग्रामपंचायत, आंबेड खुर्द, ता.संगमेश्वर यांना देण्यात आलेले पत्र |

**<u>बचावपक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी</u>**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| निरंक | | |

**<u>बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांकांची यादी</u>**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| निरंक | | |

## न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## मुद्देमाल

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे वर्णन |
|---|---|---|
| १ | वस्तू–अ/अ.सा.क्र.०४ | दोन लाकडी रिप |
| २ | वस्तू–ब/अ.सा.क्र.०४ | दोन लाकडी बांबूचे तुकडे |
| ३ | – | एक आकाशी रंगाचा टि–शर्ट |
| ४ | – | एक हिरवट खाकी हाफ पँट |

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.08.05 17:26:56 +0530

**दिनांक – ०४/०८/२०२६** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**देवरुख.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, देवरुख,**

**जि. रत्नागिरी.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A. A. Shivalkar. |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 04/08/2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | : | 04/08/2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 05/08/2026 |